**भाग---१**

* राज्याच्या आर्थिक व्यवस्थापनेत अमुलाग्र बदल.

* सन २००४-०५ या आर्थिक वर्षात आर्थिक वाढीचा दर १३.८ टक्के.

* सन २००५-०६ या आर्थिक वर्षात रुपये २६५ कोटींचे महसुली अधिक्य, १९९४-९५ नंतर अर्थसंकल्पात प्रथमच महसुली अधिक्य.

* कर वसुली मध्ये लक्षणीय वाढ.

* सन २००३-०४ च्या तुलनेत २००४-०५ मध्ये २०.६५ टक्यांनी वाढ.

* सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पिय अंदाजानुसार १७.६० टक्के वाढ अपेक्षित. योजनेत्तर महसुली खर्चावर नियंत्रण.

* सन २००५-०६ च्या रुपये ११,००० कोटींच्या वार्षिक योजनेसाठी आवश्यक त्या साधनसंपत्तीची पूर्णपणे अर्थसंकल्पीय तरतूद.

* सन २००५-०६ साठी राजकोषीय तुटीत घट होवून रुपये ती रु. ८,८५३ कोटीवर आली. (राज्याच्या ढोबळ उत्पन्नाच्या २.०९ टक्के)

* राज्याच्या आर्थिक दायित्वाचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यावसायिक निधी व्यवस्थापकाची विश्वस्त व्यवस्था स्थापन करणे.

* सुधारीत आर्थिक जबादारी विधेयक लवकरच विधानमंडळास सादर करणार.

* विभाग निहाय मासिक निधी वितरणाच्या तरतूदी, त्यामुळे निधींचे स्वयंचलित वितरण.

* राज्याच्या कर्जावरील व्याजाचा सरासरी दर ९.३३ टक्के इतका कमी झाला.

* राज्यशासकीय, निमशासकीय आणि निवृत्तीवेतन धारकाना कर्मचाऱ्यांना दिनांक १ एप्रिल २००५ पासून रोखीने ३ टक्के महागाई भत्ता मंजूर.

* राज्याची सन २००५-०६ साठीची रुपये ११,००० कोटींची वार्षिक योजना निश्चित करण्यात आली.

## बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशी

* सन २००५-१० या कालावधीत बारव्या वित्त आयोगाच्या शिफारशीमुळे शिफारशीमुळे राज्याला अंदाजे रुपये ३६,१९४.२४ कोटी प्राप्त होणार.

## महाराष्ट्र आरोग्य संस्था विकास प्रकल्प

* महाराष्ट्र आरोग्य संस्था विकास प्रकल्पावर डिसेंबर २००४ पर्यंत रुपये ४५७ कोटीं इतका एकूण खर्च झालेला आहे. सन २००५-०६ या वर्षासाठी रु. १२२.४२ कोटीची तरतूद प्रस्तावित केली आहे.

## नाशिक आणि अमरावती येथील प्रादेशिक संदर्भ केंद्र.

* नाशिक आणि अमरावती येथे अतिविशेष आरोग्य सेवा पुरविण्यासाठी प्रादेशिक केंद्र स्थापन करण्याकरिता रुपये ७ कोटींची तरतूद.

## आदिवासी उपयोजनेमधील आरोग्य योजना

* सन २००५-०६ या वर्षासाठी आदिवासी क्षेत्रातील अर्भकांची मृत्यू संख्या कमी करण्यासाठी रुपये २८.८० कोटींची तरतूद.

## राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना.

* २.१८ कोटी विद्यार्थ्यांना सुरक्षा पुरवण्यात आलेली आहे. सन २००५-०६ या वर्षासाठी रुपये २.७० कोटींची तरतूद प्रस्तावित केली आहे.

## सर्व शिक्षण मोहीम

* या योजनेखाली अद्यापपर्यंत रुपये ६७४.८० कोटींचा खर्च करण्यात आला आहे. चालू पंचवार्षिक योजनेखाली रुपये २०४४.२४ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

## शालेय पोषण आहार योजना

* राज्यातील ९७ लाख विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यासाठी रु. १५९.०७ कोटींची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

## आदिवासी उपयोजना

* सदर उपयोजनेसाठी एकूण रु. ९९० कोटींची तरतूद करण्यात आली असून सदर तरतूद वार्षिक योजनेच्या ९ टक्के एवढी आहे.

## एकात्मिक बाल विकास योजना

* पुढील आर्थिक वर्षासाठी रु. ३३.७६ कोटींची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. एकात्मिक बालविकास योजनेखाली शासनाने २,८३८ नवीन अंगणवाडी केंद्रे मंजूर केली आहेत.

## राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य आणि पोषण मिशन

* राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य आणि पोषण मिशन औरंगाबाद येथे स्थापन करण्यात येणार आहे.

## स्वयं रोजगार

* राज्यामध्ये विशेष करून नागरी क्षेत्रात विविध प्रकारच्या सेवा देणाऱ्या २८०० हून अधिक संस्था सध्या कार्यरत आहेत.

## पर्यटन धोरण

* पर्यटन क्षेत्रासाठी रु. ७९.८० कोटींची तरतूद प्रस्तवीत करण्यात आली आहे. अजंठा-एलोरा प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी जपान बँक ऑफ इंटरनॅशनल कार्पोरेशन यांनी रु. ३०० कोटीचे कर्ज मंजूर केले आहे या प्रकल्पामधील राज्य शासनाचा हिस्सा रु. ६० कोटी इतका आहे.

## पिण्याच्या पाण्यासाठी नवीन लोक सहभागाचे धोरण

* राज्य शासनाकडून नवीन लोक सहभागाच्या धोरणानुसार ३०६१ ग्रामपंचायतीमध्ये पिण्याच्या पाण्याच्या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पिण्याच्या पाण्याच्या सार्वजनिक उदभवातील पाण्याच्या रासायनिक तपासणीसाठी शासनाने सुमारे रु. ३.२५ लाख रकमेची तपासणी मोहीम हाती घेतली आहे.

## निर्मल गाव पुरस्कार

* संत गाडगेबाबा ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाबरोबरच निर्मल गाव पुरस्कार कार्यक्रम सुध्दा राज्यामध्ये सुरू करण्यात आला आहे. देशामधील ३८ ग्रामपंचायतीपैकी राज्यातील १३ ग्रामपंचायतीचा निर्मल गाव पुरस्कार योजनेखाली केंद्र सरकारकडून गौरव करण्यात आलेला आहे.

## ग्रामीण रस्ते.

* राज्यामधील ४०,००० खेडेगांवापैकी सुमारे ३८,००० खेडेगाव ग्रामीण रस्त्यांनी जोडण्यात आली आहेत.

## बांद्रा वरळी सागरी मार्ग प्रकल्प

* बांद्रा वरळी ८ पदरी सागरी मार्ग प्रकल्पाची किंमत सुमारे रु. १,३०६ कोटी असून सदर प्रकल्प डिसेंबर २००७ पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

## उद्योग

* मागील ३ वर्षाच्या कालावधीत सरासरी ९ टक्के औद्योगिक वाढ झालेली आहे. महाराष्ट्र हे देशामध्ये पहिल्या क्रमांकाचे राज्य राहीले आहे. रु. ५१३ कोटी किंमतीच्या ASIDE या केंद्र पुरस्कृत योजनेची अंमलबजावणी औद्योगिक क्षेत्रातील २९ प्रकल्पांमध्ये करण्यात येत आहे. राज्याच्या निरनिराळया औद्योगिक क्षेत्रामध्ये रु. ५५० कोटी खर्चाचा पायाभूत विकास प्रकल्प हाती घेण्यात येत आहे.

## वीज क्षेत्र

* महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने परळी आणि पारस येथे प्रत्येकी २५० मेगावॅट क्षमतेचे औष्णिक विद्युत प्रकल्प हाती घेतले आहेत. तसेच उरण, तळेगांव आणि खापरखेडा येथे नवीन विद्युत प्रकल्प उभारण्याचे प्रस्तावित केले आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ राज्यामधील एक टप्पा योजनेच्या अंमलबजावणीसाठी रुपये ५८० कोटीचे कर्ज घेणार आहे. सदर कर्जाच्या मुद्दलाच्या परतफेडीची जबाबदारी राज्य शासन स्वीकारणार आहे. यामुळे राज्यातील घरगुती वापरासाठी नियमित स्वरूपात वीज पुरवठा उपलब्ध होईल आणि भार नियमनाचा अनिष्ट परिणाम कमी होईल. ५०० मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी ऊर्जा उत्पादन क्षेत्रातील गुंतवणूकीचे धोरण.

## तिर्थक्षेत्रांचा विकास

* सन २००५-०६ साठी रुपये ३१.२३ कोटीची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. राज्य पातळीवरील १०३३ तीर्थक्षेत्र विषयक कामे प्रगतीपथावर आहेत.

## संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना

* रुपये १२१.७९ कोटीची तरतूद प्रस्तावित केली आहे.

## इंदिरा आवास योजना

* आगामी वर्षासाठी रुपये ११९.३६ कोटीची तरतूद प्रस्तावित केली आहे. चालू वर्षी १३,२०० घरांचे बांधकाम प्रस्तावित आहे.

## पीक विमा योजनेखालील नुकसान भरपाई रकमेचे वितरण

* पीक विमा योजनेखाली रब्बी २००३-०४ साठी रुपये १९३.६५ कोटी मंजूर करण्यात आले होते.

## खार जमीन विकास

* राज्यातील ११९ खार जमिन विकास योजनांखाली डिसेंबर, २००४ पर्यंत रुपये ५२.५४ कोटीचा खर्च करण्यात आलेला आहे. सन २००५-०६ साठी रुपये ४.९७ कोटीची तरतूद प्रस्तावित केली आहे.

## जल विद्युत प्रकल्प

* घाटघर आणि कोयना टप्पा-४ साठी रुपये ६२ कोटीची तरतूद प्रस्तावित केली आहे.

## मुंबईचा विकास

* मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (MUTP) अन्वये रुपये १११३ कोटी एवढ्या रकमेचे प्रकल्प प्रस्तावित करण्यात आले आहे. सन २००७ या वर्षी १०० नवीन मुंबई नागरी परिवहन प्रकल्प उपलब्ध होतील.

* रुपये २६०० कोटी खर्चाचा मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) डिसेंबर, २००७ पर्यंत पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. मुंबई नागरी परिवहन प्रकल्प आणि मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प यामुळे विस्थापित होणाऱ्या प्रकल्पाबाधित कुटुंबांसाठी ५३,००० घरांचे/सदनिकाचे बांधकाम करण्यात आले आहे. मुंबईच्या विकासासाठी रुपये १,००० कोटीची तरतूद प्रस्तावित केली आहे. पर्यटनाला चालना देण्याच्या दृष्टीने

केंद्र सरकारने त्यांच्या अर्थसंकल्पात मुंबई शहराला प्रादेशिक आर्थिक केंद्राचा दर्जा दिलेला आहे. मुंबई मधील ऐशआराम आणि पर्यटन यांना चालना देण्यासाठी गोराई भागाची विशेष आर्थिक क्षेत्र म्हणून शिफारस करण्यात येणार आहे.

## महत्वपूर्ण स्मारके

* कै. डॉ. द्वारकनाथ कोटणीस यांचे सोलापूर येथे, कै. गोविंदभाई श्रॉफ यांचे औरंगाबाद येथे तसेच कै. नारायण श्रीपाद कुलकर्णी ऊर्फ राजहंस ऊर्फ नटसम्राट बालगंधर्व यांचे सांगली जिल्ह्यातील पळुस तालुक्यामधील नागठाणे येथे त्या महान व्यक्तीच्या स्मरणार्थ उचित स्वरुपाची स्मारके उभारण्यात येणार आहे.

## विज्ञान आणि तंत्रज्ञान

* डॉ. वसंत गोवारीकर यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयक  कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने एक विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग स्थापन करण्यात आला आहे.

## छत्रपती महाराजांचा पुतळा

* मुंबई नजिकच्या अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचे प्रस्तावित केले असून, या संदर्भात तांत्रिक आणि वस्तुनिष्ठ सल्लागार समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

## वने

* नागपूर शेजारच्या गोरेवाडा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचा इको पर्यटन विषयक प्रकल्प स्थापन करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी १० वर्षे कालावधीचा आणि रुपये ८४.२१ कोटी खर्चाचा मास्टर प्लॅन प्रस्तावित करण्यात आला आहे.

## वाल्मिकी आंबेडकर आवास योजना

* या योजनेखाली आगामी वर्षात रुपये ३६.१५ कोटी खर्चाची तरतूद प्रस्तावित केली आहे. सदर योजनेखाली २,७३० राहती घरे बांधून पूर्ण झाली आहेत.

## वैद्यकीय महाविद्यालये

* सन २००५-०६ या वर्षी मराठवाड्यामधील लातूर, औरंगाबाद आणि नांदेड येथील वैद्यकीय महाविद्यालयांचे रुपये १५६ कोटी खर्चाचे श्रेणीवर्धन प्रस्तावित केले आहे.

## गुरु-ता-गद्दीची त्रिशताब्दी.

* सन २००८ मधील त्रिशताब्दी समारंभाच्या निमित्ताने पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने रुपये ८१७ कोटी रकमेचा नांदेड मास्टर प्लॅन निश्चित करण्यात आला आहे. सन २००५-०६ या वर्षासाठी रुपये १२ कोटीची तरतूद प्रस्तावित केली आहे.

## रोजगार हमी योजना.

* पुढील वर्षासाठी रुपये ५७५ कोटीची तरतूद प्रस्तावित केली आहे.

## जलदगती न्यायालये.

* राज्यामध्ये अद्यापर्यंत १८७ जलदगती न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत. या न्यायालयांनी जानेवारी, २००५ पर्यंत एकूण ९४,४५५ दिवाणी आणि फौजदारी प्रकरणे निकालात काढली आहेत. सदर न्यायलय इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी आणि पायाभूत सुविधांसाठी रुपये ४२ कोटीची तरतूद प्रस्तावित केली आहे.

**मराठी चित्रपट निर्मात्यांना आर्थिक सहाय्य.**

* मराठी चित्रपट निर्मात्यांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या आर्थिक सहाय्याची रक्कम रुपये १५ लाखावरुन रुपये २० लाखापर्यंत वाढविण्यात आली आहे. सदर क्षेत्रामधील उत्कृष्ट तांत्रिक निर्मितीसाठी आर्थिक सहाय्याची रक्कम सन २००५-०६ या आर्थिक वर्षापासून रुपये ३० लाखापर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यासाठी पुढील वर्षी ५ कोटीची तरतूद प्रस्तावित केली आहे.